२४ ९५३/५८

जाक्रमा.प्राशि-३/खाप्रसा/ना./पुवि/२००४/६३
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 11 NOV 2004

कायम विनाअनुदान सत्त्वावर/
~~विनाअनुदान/सत्त्वावर/~~

प्रति

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,

२. शिक्षण प्रमुख/~~प्रशासन अधिकारी~~
महानगरपालिका/~~नगरपालिका~~ शिक्षण मंडळ, पुणे.

**विषय** : सन २००३ - २००४ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत. (माध्यम इंग्रजी )

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक व्हिएसएल/१००१ (५५१ R003)/प्राशि-३, दिनांक २३/७/२००३

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून,२००३ पासून इ. १ ली च्या वर्गास ----- फक्त सन २००३-०४च्या शैक्षणिक वर्षात ~~प्रत्यक्ष/सुरु/असलेल्या/वर्गासह~~ शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तींवर/~~विनाअनुदान तत्त्वावर/कायम विनाअनुदान तत्त्वावर परवानगी देण्यात येत आहे.~~ तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्त्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १] | चलवादी शिक्षण संस्था, १०/११ विद्यानगर, टिंगरेनगर, पुणे. कायम विना अनुदान | टिंगरेनगर विद्यानगर जि-पुणे. | १ ली च्या वर्गास फक्त | इंग्रजी |

**सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.**

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नेमस्तपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिकाऱ्यांकडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

मुळप्रतीवर मा. शि. उ. सं. यांची सही असे.

**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग, पुणे-१.**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**

**१. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.**
**२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.**
**३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,** पुणे **यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.**
**४. मा. सचिव/अध्यक्ष,** वलवादी शिक्षण संस्था,
स. नं. १०/११ विद्यानगर, टिंगरेनगर, पुणे.

परवानगी वर्ष :- **२०११-२०१२**
माध्यम : - **इंग्रजी**
**कायम विना अनुदान**

जा.क.शिउस/माध्य-३/१२/प्र.मा./पुवि/२०१२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : - 12 FEB 2013

१८९६/१०

**प्रति,**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे.

**विषय :- कायम विना अनुदानित तत्वावर नविन इंग्रजी माध्यमिक शाळेस इ. ८ वी चे वर्गास प्रथम मान्यता मिळणेबाबत...**
**पुणे इंटरनॅशनल स्कूल ,विद्यानगर (टिंगरेनगर) रोड नं.१४, पुणे-३२.**

**संदर्भ-** १) शासन निर्णय क्र.नमाशा-२०१०/(९६/२०१०)/माशि-१ दि.१०.०३.२०१०
२) शासन निर्णय क्रमांक नमाशा-२०१०/(९६/१०)/माशि-१ दिनांक १४.१०.२०१०.
३) शासन पत्र क क.इमाशा २०१२/(९/१२)/माशि-१ दिनांक २७.७..२०१२
४) आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र. जि. प/माध्य/२६८३ दिनांक १४.१२..२०१२

उपरोक्त विषयासंदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशी विचारात घेऊन पुणे इंटरनॅशनल स्कूल, विद्यानगर, **(टिंगरेनगर)** पुणे या माध्यमिक शाळेस खालील अटींवर आणि तपासणी अहवालातील सर्वच सूचनांची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्याच्या शर्तीवर **कायम विना अनुदान तत्वावर सन २०११-२०१२** मध्ये **इयत्ता आठवी च्या वर्गास जून-२०११ पासून तात्पुरती प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

१ नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

२.माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.

३. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

४.संचनिश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

५. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.

६. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

७.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

८. सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून तीन वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

**इतर अटी :-**

जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येंवू नयेत.

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे

४.सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी.व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.

.. २....

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे.वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ :-१) शासन पत्र क्रमांक याचिका-२००९/प्र.क्र.२४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर २००९.

२) संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२००९/६४११६/याचिका/१५ क(८)९३४४ दिनांक २४ सप्टेंबर-२००९.

**६. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेला निकष, शर्ती, अटी यांच्या पूर्ततेसह शाळास इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.**

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तींची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा.

**(धनाजी बुटे )**
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-**१.करिता**

स्थळप्रतीवर मा.शिक्षण उपसंचालक यांची सही असे.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**
**१. मुख्याध्यापक पुणे इंटरनॅशनल स्कूल ,विद्यानगर (टिंगरेनगर) पुणे-३२.**
**२. विभागीय सचिव, पुणे विभागीय शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.**
प्रत माहितीसाठी सादर,
१.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.
२.निवडनस्ती.

महाराष्ट्र शासन

**शासन परवानगी आदेश**

क: इंमाशा २०१२/(९/१२ )/माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक: जुलै, २०१२

प्रति,

अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
शिवाजीनगर, पुणे

**विषय:**- इंग्रजी माध्यमाच्या इ.७ वी पर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस इ.८ वी ते १० वी चे इंग्रजी माध्यमाचे वर्ग जोडून कायम विना अनुदान तत्वावर सूरु करण्यास परवानगी देण्याबाबत

**संदर्भ:**- १) शासन निर्णय, क्र.नमाशा २०१०/(९६/२०१०)/माशि-१, दि.१०.०३.२०१०
२) शासन निर्णय, क्र.नमाशा २०१०/(९६/२०१०)/माशि-१, दि.१४.१०.२०१०
३) संस्थेचा दि.५/०७/२०११ चा अर्ज व सर्व संबंधित कागदपत्रे

महोदय,

सोबत जोडलेल्या संस्थेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, चलवादी शिक्षण संस्था, प्लॉट नं.१०/११, विद्यानगर, टिंगरेनगर, जि.पुणे संस्थेद्वारे संचलित इंग्रजी माध्यमाच्या इ.७ वी पर्यंत सुरु असलेल्या पुणे इंटरनॅशनल स्कूल, विद्यानगर, पुणे येथील प्राथमिक शाळेस जोडून इंग्रजी माध्यमाचे इ.८ वी ते इ.१० वी चे वर्ग कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास शासन स्तरावरुन पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे:-

८) परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्राकरिता (प्रथम प्रोव्हिजनल व नंतर रेग्यलुर) अर्ज करणे आवश्यक राहील.

९) सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणा-या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफिलिएशन) आवश्यक असणा-या सर्व निकषांची पूर्तता करणाच्या अधीन राहतील.

१०) राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफिलिएशन) निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील.

११) परवानगी दिलेल्या ठिकाणावरुन सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

१२) संबंधित शाळेने शासन, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च् माध्यमिक), पुणे व राज्य मंडळ यांच्यातर्फे निर्गमित केल्या जाणा-या सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१३) परवानगी देण्यात आलेल्या इ.८ वी ते इ.१० वीच्या वर्गामध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकवणे आवश्यक राहील.

१४) परवानगी आदेशाच्या वेळी शाळेत सुरु असलेल्या सर्व वर्गांना या आदेशाद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

(सु.न.जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव /. मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
३. विभागीय शिक्षण उपसंचालक, /शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
४. सचिव, चलवादी शिक्षण संस्था, प्लॉट नं.१०/११, विद्यानगर, टिंगरेनगर, जि.पुणे
५. निवड नस्ती/माशि-१

शिक्षणमंडळ कार्यालय, पुणे मनपा.
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन
जुना तोफखाना, शिवाजीनगर,
जा.क्र. खाप्राशा ९८४
दि. २१/६/११

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,
ज्ञानवादी शिक्षण संस्था
पुणे इंटरनॅशनल स्कूल टिंगरे नगर-पुणे-३२

विषय- कायम विनाअनु दानित त्तवावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत. शाळेच्या दि १०-५-२०११ चा प्रस्ताव

संदर्भ :१. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एम. १००२(१०००/०२)प्राशि -३ दिनांक २३.१.०३.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | शाळेचे माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| 1) | इंग्रजी | २री | नैसर्गिकवाढ | २००४ |
| | | ३री | —"— | २००५ |
| | | ४थी | —"— | २००६ |
| | | ५वी | —"— | २००७ |
| | | ६वी | —"— | २००८ |
| | | ७वी | —"— | २००९ |

**अटी व शर्ती:-**

१. सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक, व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.
२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.
३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
५. सदरशाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.
६. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

(सही)
शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

कायम विनाअनुदान

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र.शिक्षण/माध्य/नैवा/2618/१३
पुणे दिनांक १० /७/२०१३

प्रति,

**अध्यक्ष/ सचिव/ मुख्याध्यापक,**
**चलवादी एज्युकेशन सोसायटीचे**
**पुणे इंटरनॅशनल स्कूल, विदयानगर**
**पुणे-३२.**

विषय - **नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत**
इ.९ वी (सन २०१२-१३) व इ.१० वी (सन २०१३-१४)

संदर्भ - १) मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.शिउसं/ माध्य-३/१३/प्र.मा./पुवि/२०१३/४१८६/९० दिनांक १२/२/२०१३
२) आपलेकडील प्राप्त प्रस्ताव दिनांक १४/६/२०१३

आपल्या **चलवादी एज्युकेशन सोसायटी पुणे** संचलीत **पुणे इंटरनॅशनल स्कूल, विदयानगर पुणे-३२** या कायम विनाअनुदानित इंग्रजी माध्यमिक शाळेतील इ.८ वीच्या वर्गास जून २०११ पासुन कायम विनाअनुदान तत्वावर उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांनी परवानगी / प्रथम मान्यता दिलेली आहे.

सदर विदयालयात जून २०१२ पासून इ.९ वी व जून २०१३ पासून इ.१० वीचे वर्ग सुरु केलेले असुन सदरच्या दोन्ही वर्गास अनुक्रमे **जून २०१२ व जून २०१३ पासुन नैसर्गिक वाढीने कायम विनाअनुदान तत्वावर** परवानगी देण्यात येत आहे.

( बी.के. दहिफळे )
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
पुणे जिल्हा परीषद, पुणे.

प्रत - मा.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सादर.

11/10/13
कनिष्ठ लिपीक
आवक शाखा
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १